नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०९/२०२६ (रविवार)**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयातील गणेशोत्सव बंदोबस्ताकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या उपाययोजना आणि तयारी
## १६०७ गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई

दिनांक १४/०९/२०२६ ते २५/०९/२०२६ या कालावधीत संपुर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा केला जाणार असून दिनांक १४/०९/२०२६ रोजी सर्वत्र गणेश स्थापना होत आहे. दिनांक १४/०९/२०२६ रोजीपासुन गणेशोत्सवाकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशन अंतर्गत नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून व्यापक बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले असून यामध्ये **अपर पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण यांच्यासह ०६ उपविभागीय पोलीस अधिकारी, ३१ पोलीस निरीक्षक, १३१ सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक तसेच १५८८ पोलीस अंमलदार असे एकूण १७५७ पोलीस अधिकारी व अंमलदार बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त राज्य राखीव दलाचे ०१ प्लाटुन, नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे ०२ दंगा नियंत्रण पथक, ७८० होमगार्ड तैनात करण्यात आलेले आहेत.** तसेच गणेशोत्सव कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच गर्दीच्या ठिकाणी घडणाऱ्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सर्व्हेलन्स व्हॅन तैनात करण्यात आल्या आहेत. सर्व ०६ उपविभागामधील सर्व पोलीस स्टेशनला एकुण २४ रूट मार्च घेण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे कोणत्याही अप्रिय घटनेला सामोरे जाण्यासाठी एकुण २४ महत्वाचे ठिकाणी दंगा नियंत्रण योजनेचा सराव घेण्यात आला आहे.

**संपुर्ण गणेशोत्सव शांततेत पार पडावा आणि सण—उत्सवांच्या काळात जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच सार्वजनिक शांततेला कोणताही धोका निर्माण होऊ नये याकरिता नागपुर पोलीस प्रशासनाने गुन्हेगारांविरुद्ध कडक प्रतिबंधात्मक कारवाई करत कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवण्याची शक्यता असलेल्या गुन्हेगारा विरूध्द कलम १२६ भा.ना.सु.सं अन्वये ६६० कारवाई , कलम १२९ भा.ना.सु.सं अन्वये ४०० कारवाई , १२६ बंधपत्र रद्द कारवाई एम.पी.डी.ए कायदयान्वय २४ आरोपीतांवर कारवाई , MCOCA प्रमाणे १४ कारवाई मध्ये ८१ आरोपीवर, प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. PITNDPS प्रमाणे १**

**कारवाई करण्यात आली आहे. सोबतच कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवण्याची शक्यता असलेल्या ३१५ सराईत गुन्हेगारांना कलम १६३ भा.ना.सु.सं मधील तरतुदींनुसार सण—उत्सवाच्या कालावधीत ठराविक पोलीस स्टेशनच्या हद्दीत व विशिष्ट भागात येण्यास पूर्णपणे प्रतिबंध (हद्दपार) करण्यात आला आहे. अशा एकुण १६०७ गुन्हेगारांवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच अश्या गुन्हेगारांवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून गणेशोत्सवाच्या काळामध्ये कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या व शांतता बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही समाज विघातक व्यक्ती विरूध्द कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.**

तसेच नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांद्वारे सोशल मिडीयाचे सतत मॉनिटरींग केले जात असुन सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावणाऱ्या पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणा—यांवर कठोर कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.नागपूर ग्रामीण क्षेत्रामध्ये संपुर्ण गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाने संपुर्ण तयारी पुर्ण केली असून गणेशोत्सवाच्या कालावधी मध्ये कोणतीही परिस्थिती हातळण्याकरीता नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज आहे. **सर्वनागरीकांनी उदया दिनांक १४/०९/२०२६ ते विसर्जना पर्यन्त संपुर्ण गणेशोत्सव शांततेत, आनंदात व नियमांचे पालन करून पार पाडावा असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.**

## जनावरे चोरीचे ०६ गुन्हे उघड, ०४ आरोपीतांना अटक,
## ९ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस निरीक्षक श्री. अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जनावरे चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघड करून ४ आरोपींना अटक केले आहे.**

दिनांक १२/०९/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपी **१) सलीम दाऊत शेख, वय २८ वर्षे, रा. विकास कॉलनी, कोंढाळी, जि. नागपूर ग्रामीण.२) रोशन उर्फ नल्ला धनराज धोत्रे, वय ३२ वर्षे, रा. विकास कॉलनी, कोंढाळी, जि. नागपूर ग्रामीण ३) सूरज निरंजन सावरकर, वय ३२ वर्षे, रा. दुधाळा, ता. काटोल, जि. नागपूर ग्रामीण ४) मोहम्मद फरमान इमाम शेख कुरेशी, रा. कुरेशी मोहल्ला, बंगला चौक, वरूड, जि. अमरावती ५) विधी संघर्षग्रस्त बालकाने**

**सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले.** आरोपींना ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी परिसरात म्हशी चोरीचा गुन्हा केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील **आरोपी क्र. १) ते ४) यांना अटक करण्यात आली आहे.**

**पोलीसांनी आरोपीतांकडुन १) गुन्ह्यातील चोरीच्या म्हशी विकून मिळवलेली नगदी रक्कम २,०५,०००/— रूपये, २) गुन्हयात वापरलेले महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एम एच—४०/सी टी—००४५ किंमती ७,००,०००/—रूपये, ३) हिरो होंडा मोटर सायकल क्र. एम एच—४०/ए एस—६३५२ किंमती ५०,०००/— रूपये असा एकूण किंमती ९,५५,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन खालील ०६ गुन्हे उघडकीस आणले आहे.**

१) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ४७८/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

२) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ५१६/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

३) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ५६९/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

४) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ६६४/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

५) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ६७२/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.

६) पो.स्टे. कोंढाळी अप. क्र. ६७४/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं.



# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ०३ गोवंश जनावरांची सुटका अरोली पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटे उपवविभाग यांच्या मार्गदर्शनात सहा पोलीस निरीक्षक श्री. सागर गोमासे,प्रभारी अधिकारी,पोलीस स्टेशन अरोली यांच्या नेतृत्वाखाली अरोली पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ०३ लाख ८० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक १३/०९/२०२६ रोजी अरोली पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन अरोली हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी असोली ते अरोली रोड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा एस वाहन क्र एम एच—४०/सी टी—६८५६ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **चालक नामे १) आदित्य सुनील दुरबुळे, वय २४ वर्ष, क्लीनर नामे २) कुणाल सुनील दूरबुळे, वय २६ वर्ष, दोन्ही रा. असोली हे मिळुन आले**. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०३ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा एस वाहन क्र एम एच—४०/सी टी—६८५६ किंमती ३,००,०००/— रूपये आणि ०३ गोवंश जनावरे किंमती ६०,०००/— रूपये, २ विवो कंपनीचे अँड्रॉइड मोबाईल किंमती २०,०००/— रू असा एकूण ३,८०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे कलम २८१, १२५, ३(५) भा.न्या.सं., सहकलम १८४, १७९ मोवाका. सहकलम ११(१), (ड), प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (२), ९ महा पशु सरक्षण अधि १९७६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**



## अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री विरोधात कळमेश्वर पोलीसांची विशेष मोहीम, ०५ गुन्हे नोंद
## गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत २ लाख ९१ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १२/०९/२०२६ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा

**उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात ,पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी कळमेश्वर पोलीस, दंगानियंत्रण पथक, होमगार्ड यांच्यासह गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत. अवैध दारू निर्मिती आणि विक्री करणारे आरोपी यांचेवर कारवाई केली.**

**दिनांक १२/०९/२०२६ रोजी मौजा गौंडखैरी पारधी बेडा येथे ०५ आरोपींवर कारवाई करत घटनास्थळावरील हातभट्टया नष्ट करून पोलीसांनी पंचासमक्ष २१० लिटर गावठी दारू, ७,००० लिटर मोहफुल सडवा तसेच इतर साहित्य असा एकूण २,९१,५००/— किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन तसेच अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

## आरोपी अटक

**पोलीस स्टेशन वडोदा:—** पोलीस स्टेशन वडोदा हद्दीत हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून वावरत असलेल्या इसमास वडोदा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक चाकू जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध कलम २२३ भा.न्या.सं., १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम, ४,२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

दि. १२/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वडोदा हद्दीत कन्हान व मौदा तालुक्यातून उपविभागीय दंडाधिकारी, मौदा यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये हद्दपार केलेला इसम नामे मंगेश श्रावण भुसारी, वय ३७ वर्षे, रा. अंबाडी, ता. कामठी, जि. नागपूर हा गावात फिरत असल्याची विश्वसनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली.माहिती मिळताच वडोदा पोलिसांनी तत्काळ पोलीस पथक रवाना करून सदर इसमास ताब्यात घेतले. पंचांसमक्ष त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक धारदार चाकू मिळुन आला. त्यामुळे हद्दपार आदेशाचे उल्लंघन तसेच अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम २२३ भारतीय न्याय संहिता, सहकलम कलम १३५ महाराष्ट्र

पोलीस अधिनियम, सहकलम ४, २५ भा. ह. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीस पोलिसांनी तात्काळ अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## प्रतिबंधात्मक हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भिवापूर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापूरः—** नागपुर ग्रामीण पोलीसांनी यांनी बैल पोळा उत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कलम १६३(२) अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. सदर आदेशानुसार उत्सव कालावधीत तसेच 'दिनांक ०९/०९/२०२६ ते १२/०९/२०२६ दरम्यान भिवापूर हद्दीत प्रवेश न करण्याबाबत खालील नमुद आरोपींना प्रतिबंध करण्यात आला होता.

सदर प्रतिबंधात्मक आदेशाची माहिती असतानाही **आरोपी १) सचिन बाळक्रिष्ण शंभरकर, वय ३५ वर्ष, रा. सिदधार्थ नगर, भिवापुर भिवापुर २) महीला आरोपी क्रं १ ची पत्नी आणि ३) महेंद्र देवाजी गजभिये, वय ६२ वर्ष, रा. मानोरा, ता. भिवापुर** यांनी आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी कलम २२३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून जिल्ह्यात प्रवेश करणाऱ्या आरोपीविरुद्ध नरखेड पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन नरखेडः—** महीला आरोपी रा. खेडी कार्यात, ता. नरखेड हीला उपविभागीय दंडाधिकारी, काटोल उपविभाग, काटोल यांनी आदेश पारित करून नागपूर जिल्ह्यातून 'एक महिन्याच्या कालावधीसाठी हद्दपार केले होते. सदर हद्दपार आदेशाची अंमलबजावणी दिनांक १५/०८/२०२६ पासून करण्यात आली होती. सदर आदेशाची पूर्णतः माहिती असतानाही हद्दपार आरोपी ही कोणतीही पूर्वपरवानगी न घेता नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथील आपल्या घरी परत आल्याचे मिळुन आली.

हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून विनापरवानगी जिल्ह्यात प्रवेश केल्याप्रकरणी तिच्याविरुद्ध 'महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १२ गुन्हे दाखल, ०३ लाखाचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १२/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १२ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत ०५** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत ०१** गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४३२० मिली देशी दारू, ११८०० मिली विदेशी दारू, २१५ लिटर मोहाफुल दारू, ७००० लिटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य असा एकुण ३,००४२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अवैध जुगार खेळणाऱ्या २७ आरोपींवर गुन्हे दाखल ५२ ताशपत्ते, ०३ मोबाईल व ४९ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करून विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या २७ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०१ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा आणि ०२ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा आणि ०४ आरोपीविरूद्ध ०१ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार

खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०३ गुन्हे नोंद** करण्यात आले आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे ५ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा नोंद** आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ८ आरोपीविरूध्द १ गुन्हा, नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ४ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद आरोपी हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे ३ आरोपीविरूध्द १ गुन्हा नमुद हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा** नोंद आहे.

**वर प्रमाणे २७ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते व सट्टापट्टी साहित्य ०३ मोबाईल, नगदी एकुण ४९,३६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**